MHAK100012432022

**Civil M.A./114/2022**
**Rekhabai Ganesh Makode Vs. Nil**

# निशाणी क्रमांक ०१ खाली आदेश

१)   अर्जदाराने सदरचा अर्ज हा बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम ०२ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२)   अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार हि सचिन गणेश माकोडे याची आई आहे. सचिन गणेश माकोडे याचा मृत्यु दिनांक ०१.०७.२०२२ रोजी अपघातामध्ये झाला आहे. मयत सचिन गणेश माकोडे याच्या मृत्युनंतर अर्जदार ही त्याची एकमेव कायदेशीर वारस आहे. अर्जदाराला मयत सचिन गणेश माकोडे याच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने तीने सदरचा अर्ज न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे.

३)   अर्जदाराने केलेला अर्ज, परिस्थिती, समोर आलेला पुरावा तसेच अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद यांचा विचार करता या प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावर सविस्तर कारणमिमांसा देवून मी खालीलप्रमाणे माझा निष्कर्ष आणि निवाडा दिला आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. अर्जदार हे सिध्द करते का कि, ती मयत सचिन गणेश माकोडे याची वारस आहे? | ... | होय. |
| २. आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक १ व २ करिता :

४) अर्जदाराने त्यांचा पूरावा प्रतिज्ञालेख नि.क्र.०७ वर दाखल केला. अर्जदाराने त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रात त्यांच्या अर्जातील मजकूराचा पुर्नउल्लेख केला आहे. अर्जदाराने मयताचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र.११ दाखल केले. अर्जदाराचा शपथेवरील पुरावा व अर्जदाराचे आधारकार्ड नि.क्र.१२ यांवरून असे दिसून येते की, अर्जदार ही मयत सचिन गणेश माकोडे याची वारस आहे.

५) दिनांक ०१.०९.२०२३ रोजी दैनिक 'जनमाध्यम' वृत्तपत्र नि.क्र.३१ मध्ये, चावळीवर व या न्यायालयाच्या सुचना फलकावर अर्जाबाबत जाहिर नोटिस प्रसिध्द करूनही अर्जदाराला मयत सचिन गणेश माकोडे याची वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणीही आक्षेप घेतलेला नाही. अर्जदाराचा पुरावा व अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा याला कोणीही आव्हान केलेले नाही. त्यामुळे अर्जदाराला वारस प्रमाणपत्र देण्यास काहीही बाधा दिसून येत नाही. म्हणुन अर्जदाराचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजुर करणे योग्य राहील. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरात खालील आदेश पारीत करीत आहे :–

## आ दे श

१) अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार–रेखाबाई गणेश माकोडे ही मयत सचिन गणेश माकोडे याची वारस आहे असे प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार न्यायालयीन शुल्क घेऊन देण्यात यावे.

३) अर्जदाराला सदर वारसप्रमाणपत्राचा आर्थिक लाभासाठी उपयोग करता येणार नाही याची नोंद प्रमाणपत्रावर घेण्यात यावी.

(कैलास कों.कुरंदळे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर

दिनांक:०४.१०.२०२३.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original .

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : R. P. Khandare |
| Court Name | : Kailas K. Kurandale, C.J.J.D. & J.M.F.C., Patur |
| Date | : 04.10.2023 |
| Signed by presiding officer on | : 04.10.2023 |
| Uploaded on | : 05.10.2023 |